## MAHARASHTRA ACT No. XLIV OF 1965.

## THE MAHARASHTRA GOVERNMENT SERVANTS ENQUIRIES (EVIDENCE OF CORRUPTION) ACT, 1965.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक १७ ऑक्टोबर १९६५ रोजी मिळालेली असल्यामुळे तो याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**बी. पी. दलाल,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XLIV OF 1965.

## AN ACT TO MAKE BETTER PROVISION FOR DEALING WITH CORRUPTION AMONG PUBLIC SERVANTS.

## सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४.

[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दिनांक २६ ऑक्टोबर १९६५ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

**सरकारी कर्मचाऱ्यांच्या भ्रष्टाचारासंबंधी अिलाज करण्याकरिता अधिक चांगली तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, भ्रष्टाचाराचा आरोप असलेल्या सरकारी कर्मचाऱ्यांसंबंधी अधिक परिणामकारक अिलाज करण्याची तरतूद करणे आवश्यक आहे ; आणि त्या प्रयोजनाकरिता विवक्षित परिस्थितीमध्ये गैरवर्तणूक केल्याचे गृहीत धरण्याकरिता तरतूद करणे आवश्यक आहे ; त्याअर्थी भारतीय गणराज्याच्या सोळाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. ह्या अधिनियमास महाराष्ट्र सरकारी कर्मचारी चौकशी (भ्रष्टाचाराचा पुरावा) अधिनियम, १९६५ असे म्हणावे. लघु संज्ञा.

२. संदर्भावरून अन्यथा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर, ह्या अधिनियमात, "सरकारी कर्मचारी" या संज्ञेचा अर्थ, महाराष्ट्र राज्याच्या कामकाजासंबंधी असलेल्या कोणत्याही सरकारी सेवेत किंवा पदावर ज्याची नियुक्ती करण्यात आली आहे व ज्याच्या सेवेच्या अटींचे नियमन करण्यास राज्य विधानमंडळ सक्षम आहे असा इसम, असा समजावा. व्याख्या.

गैरवर्तणूक केल्याचे गृहीत धरणे.

३. जर सरकारी कर्मचाऱ्याविरुद्ध भ्रष्टाचाराबद्दल केलेल्या चौकशीत, कर्मचाऱ्याच्या माहीत असलेल्या उत्पन्नाच्या साधनांच्या मानाने अधिक प्रमाणात असलेल्या ज्या आर्थिक साधनांचा किंवा संपत्तीचा त्यास समाधानकारक हिशोब देता येत नाही अशी आर्थिक साधने किंवा संपत्ती, त्याच्या किंवा त्याच्या वतीने कोणत्याही इसमाच्या ताब्यात आहे किंवा असा कर्मचारी आपल्या पदावर असतानाच्या कालावधीत कोणत्याही वेळी त्याच्या किंवा त्याच्या वतीने इतर कोणत्याही इसमाच्या ताब्यात होती असे सिद्ध झाले असेल तर, असे सिद्ध झाल्यानंतर चौकशी अधिकाऱ्याने आणि इतर कोणत्याही संबंधित प्राधिकाऱ्याने, तद्विरुद्ध सिद्ध करण्यात आले नाही तर, असा कर्मचारी गैरवर्तणूक केल्याबद्दल अपराधी असल्याचे गृहीत धरले पाहिजे.

(यथार्थ अनुवाद)

वा. ना. पंडित,

भाषा संचालक, महाराष्ट्र शासन.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई